नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/११/२०२६ (शुक्रवार)

वरिष्ठ पोलीस अधीक्षक मा. श्री हर्ष पोद्दार यांच्याकडून नागपूर ग्रामीण पोलीस अंमलदारांना दिवाळीची अनोखी भेट; १३७ अंमलदारांना पदोन्नती

दिवाळीच्या मंगलमय आणि आनंददायी पर्वाचे औचित्य साधून नागपूर ग्रामीण पोलीस दलातील १३७ पोलीस अंमलदारांना पदोन्नती प्रदान करण्यात आली आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नगापुर ग्रामीण यांनी पोलीस अंमलदारांना पदोन्नतीची आनंदवार्ता देत त्यांना दिवाळीची अनोखी भेट दिली आहे. यामुळे पदोन्नतीप्राप्त अंमलदारांच्या आनंदात द्विगुणित भर पडली असून, त्यांच्या कुटुंबीयांसाठीही ही दिवाळी विशेष आनंदाची आणि अभिमानाची ठरली आहे.

या पदोन्नतीमध्ये ६४ पोलीस हवालदारांना सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदावर, तर ७३ पोलीस नाईक अंमलदारांना पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नगापुर ग्रामीण यांनी आदेश निर्गमित केले असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया नियमानुसार पूर्ण करण्यात आली.

पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार हे कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंध व तपास, नागरिकांची सुरक्षा तसेच जनतेला सेवा देणे यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावत असतात. त्यांच्या सेवाकार्याची दखल घेत त्यांना पदोन्नतीच्या माध्यमातून पुढील जबाबदारीची संधी मिळणे ही निश्चितच प्रोत्साहन देणारी बाब आहे. पदोन्नतीमुळे संबंधित अंमलदारांना अधिक जबाबदारीने, उत्साहाने आणि समर्पित भावनेने कर्तव्य बजावण्याची प्रेरणा मिळणार आहे.

दिवाळीसारख्या आनंदाच्या सणात मिळालेली ही पदोन्नती संबंधित अंमलदारांसाठी आनंददायी आणि अविस्मरणीय भेट ठरली आहे. मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नगापुर ग्रामीण, श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती पुजा गायकवाड,पोलीस उपअधीक्षक (गृह) यांनी सर्व पदोन्नतीप्राप्त अंमलदारांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील सेवाकाळासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

'नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने सर्व १३७ पदोन्नतीप्राप्त अंमलदारांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!'

अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ४ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन भिवापुर :— दिनांक ०५/११/२०२६ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्तबामीदारा द्वारे खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा **गोंडबोरी नदीजवळील आकराजवळ पाण्याच्या टाकीपुढे** सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. भिवापुर पोलीसांनी तात्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता काही इसम जुगार खेळतांना मिळुन आले. सदर प्रकरणी आरोपी **१) रामकुमार मनिराम कुशवाह, वय ३६ वर्ष, रा. हनूमान मंदिरचे जवळ, मरूपार पुनवर्सन, ता. भिवापूर, जि. नागपुर, २) सुनिल डोमाजी लाटकर, वय ३२ वर्ष, रा. वार्ड क. ०१, मरूपार पुनवर्सन, ता. भिवापूर, जि. नागपुर, ३) आकाश कृष्णाजी शेंडे, वय २९ वर्ष, रा. वार्ड क. ०१, मरूपार पुनवर्सन, ता. भिवापूर, जि. नागपुर, ४) अतुल अरविंद मानकर, वय २२ वर्ष, रा. वार्ड क. ०३, मरूपार पुनवर्सन, ता. भिवापूर, जि. नागपुर (५) संकेत शास्त्री भोयर वय २० वर्ष रा. वार्ड क ०१, भागेबोरी, ता. भिवापूर, जि. नागपुर** आणि इतर ०३ आरोपी यांच्या **विरुद्ध कलम १२ म.जू.का. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**

पोलीसांनी पंचासमक्ष ५२ ताशपत्ते, एकुण रोख रक्कम, ७ मोटर सायकल,४ मोबाईल आणि इतर साहीत्य असा एकुण ४,०५,३३०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.



अवैध दारू विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १३ गुन्हे दाखल

दिनांक ०५/११/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची विक्री, दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १३ गुन्हे दाखल केले.

पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपी नामे पंडीतजी बमनोटे, वय—७० वर्ष, रा.वॉर्ड क्रं ०१, केळवद, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन सावनेर** येथे महीला आरोपी हीचेवर ०१ गुन्हा आहे. **पोलीस स्टेशन नरखेड** येथे आरोपी नामे राजा गुलाब ईसके, वय ४७ वर्ष, रा. मोवाड, तह. नरखेड याचेवर ०१ गुन्हा आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे हर्षल रमेशराव मानकर, वय ३६ वर्ष, रा. दिग्रस बु. ता. काटोल याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे., **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १) जगदीश मधुकर भोंडे, वय ४० वर्ष, रा. अंबाडा (सायवाडा) ता.नरखेड जि. नागपुर ,२) किशोर दिवाकर धोटे, वय ३० वर्ष, रा. सायवाडा (अंबाडा) ता. नरखेड जि. नागपुर ,३) मिलींद सुधाकर टेंभेकर, वय ३८ वर्ष, रा. दातेवाडी, ता. नरखेड जि. नागपुर ४) निलेश दादाराव ठाकरे, वय ४३ वर्ष, रा.

खारगड, ता. नरखेड जि. नागपुर, ५) रोशन दामुजी सर्याम, वय २२ वर्ष, रा. खारगड, ता. नरखेड,जि.नागपुर ६) महादेव रघुनाथ बगडते, वय ५२ वर्ष, रा. अंबाडा, ता. नरखेड, जि. नागपुर, ७) संदिप भिमराव बागडे, वय ३८ वर्ष रा. सायवाडा ता. नरखेड जि. नागपुर याचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा नोंद एकुण ०७ गुन्हे, **पोलीस स्टेशन भिवापुर** येथे आरोपी नामे युवराज गुलाब नान्हे, वय ४२ वर्ष, रा. नवेगाव देशमुख. ता. भिवापुर, जि. नागपुर. याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे राजन नामदेव कोधरै, वय ५७ वर्षे, रा. गाडेघाट वार्ड, क.०३, ता. पारशिवनी याचेवर ०१ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण ६१२० मिली देशी दारू, ६ लिटर मोहाफुल दारू असा एकुण ३०७० /— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर